# प्रेस नोट

## भाऊलाल रामचंद्र पटले, वय ५३ वर्षे, पद –कनिष्ठ लेखा अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, सालेकसा जि. गोंदिया यांचेविरूध्द २,०००/– रूपये लाच रक्कम स्विकारल्यावरून गुन्हा दाखल.

तक्रारदार हे सेवानिवृत्त सहायक लेखाधिकारी असुन सन २०११–१२ मध्ये पंचायत समिती सालेकसा येथे नेमणुकीस असतांना त्यांनी तत्कालीन खंडविकास अधिकारी यांच्या आदेशान्वये कार्यालयासाठी आवश्यक किरकोळ साहीत्य अंदाजे ४६,०००/– रूपयांचे खरेदी केले होते. त्याबाबत सादर केलेले बिल तत्कालीन खंडविकास अधिकाऱ्यांने मंजुर केले होते. परंतु अनुदान नसल्याच्या कारणावरून प्रलंबित ठेवण्यात आले होते. सदर प्रलंबित बिलाची रक्कम मिळण्याकरिता तक्रारदार यांनी उप लोकायुक्त यांना अर्ज केला होता. त्यावर सुनावणीअंती सदर बिले तपासुन अदा करण्याचे निर्देश खंडविकास अधिकारी सालेकसा यांना दिले. त्यानुसार पुढील करावयाच्या कारवाईबाबत विचारपुस करण्याकरिता तक्रारदार भाऊलाल रामचंद्र पटले, कनिष्ठ लेखा अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, सालेकसा यांना भेटले असता सदर प्रलंबित मंजुर बिलाचा धनादेश देण्याकरीता ४,०००/– लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना भाऊलाल रामचंद्र पटले यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देण्याची मुळीच ईच्छा नसल्यामुळे तक्रारदाराने यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता ला.प्र.वि. गोंदिया येथे तक्रार नोंदविली.

प्राप्त तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदीया तर्फे दि. २२/०३/२०१८ रोजी सापळा कार्यवाही आयोजीत केली असता सापळा कार्यवाही दरम्यान भाऊलाल रामचंद्र पटले, कनिष्ठ लेखा अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, सालेकसा यांनी तक्रारदाराचे प्रलंबित मंजुर बिलाचा धनादेश देण्याकरीता ४,०००/– लाचेची मागणी करून पहिला हप्ता म्हणुन रू. २,०००/– लाच रक्कम स्विकारली. यावरून त्यांचेविरूध्द पोलीस स्टेशन सालेकसा जि. गोंदिया येथे कलम ७,१३(१)(ड), सहकलम १३(२) ला.प्र.कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात येत आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी ईसम लाचेची मागणी करीत असल्यास कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा.

SP ACB NAGPUR 7040222221
LANDLINE NO 0712/2561520
TOLL NO 1064
Website: www.acbmaharashtra.gov.in
Mobile app: www.acbmaharashtra.net
Facebook page: www.facebook.com/MaharashtraACB
Whatsapp: 9930997700

(रोशन यादव)
वाचक पोलीस उप अधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो नागपूर
मो.नं. ९९२३३५५२३९